# महागाई भत्त्यासाठी बीएसएनएल आक्रमक

## मुख्यालयासमोर दिवसभर धरणे

प्रतिनिधी | नाशिक

बीएसएनएल अधिकारी कर्मचारी कृती समितीतर्फे शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले. १ जानेवारी २००७ पासून देय ७८.२ टक्के महागाई भत्ता मूळ वेतनात तत्काळ समाविष्ट करावा, या प्रमुख मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. महाप्रबंधक कार्यालय, संचार भवन, मायको सर्कल येथे ३०० अधिकारी, ५०० कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

आंदोलनाचा परिणाम कामकाजावर होऊ नये यासाठी कर्मचाऱ्यांनी दोन दोन तास आंदोलनात सहभाग घेतल्याचे सचिव एस. ए.भदाणे यांनी सांगितले. आंदोलनात अधिकारी संघटनेचे संयुक्त



महासचिव एम. बी. सांगळे, परिमंडल पदाधिकारी श्रीधर भड, व्ही. पी. कुलकर्णी, बी. डी. गायकर, एल. एम. शिंदे, पी. एन. पाटील, घनश्याम वाघ, दिलीप गोडसे, राजीव जाधव, जी. जी. बोरसे, भास्कर आवारे यांसह अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते.